# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**अत्यंत तातडीचे/महत्वाचे**

क्रमांक संगाबाअवि/३/संपमूम/२१९/२०२१
दिनांक : २९/०६/२०२१

प्रति,

प्राचार्य / विभागप्रमुख / मानद संचालक,
सर्व संलग्नीत संबंधीत महाविद्यालये, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील पदवी व पदव्यूत्तर शैक्षणिक विभाग
मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा.

**विषय : उन्हाळी-२०२१ परीक्षा संचालनाकरीता कार्यपद्धती जाहिर करण्याबाबत.**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर शासनाद्वारे प्राप्त निर्देश तथा मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यापरिषद, परीक्षा व मूल्यमापन मंडळ व व्यवस्थापन परिषद या प्राधिकारीणीनी घेतलेल्या निर्णयाच्या आधारे तयार करण्यात आलेली उन्हाळी-२०२१ परीक्षा संचालनाची कार्यपद्धती पुढील Appendix-I, II & III नुसार जाहिर करण्यात येत आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

**Appendix-I**

## शैक्षणिक सत्र-२०२०-२१ मधील उन्हाळी-२०२१ विद्यापीठ परीक्षांच्या आयोजनाबाबत

## भाग-१

### अ) परीक्षा पद्धती :-

१) उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता सर्व संलग्नीत महाविद्यालये/विद्यापीठ शैक्षणिक विभाग/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा ही परीक्षा केंद्र म्हणुन राहतील. **हिवाळी-२०२० परीक्षेकरीता महाविद्यालयांनी नियुक्त केलेले परीक्षा केंद्राधिकारीच उन्हाळी-२०२१ परीक्षेसाठी सुद्धा कायम राहतील. हिवाळी-२०२० परीक्षांकरीता प्रत्यके महाविद्यालयाचा जो ईमेल-आय.डी. विद्यापीठाने Approve केलेला आहे त्याच ईमेल-आय.डी. वर उन्हाळी-२०२१ परीक्षांच्या प्रश्नपत्रिका पाठविण्यात येतील.**

२) उन्हाळी-२०२१ ही परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने घेण्यात येईल. विद्यार्थ्यांना उन्हाळी-२०२१ परीक्षा ऑनलाईन किंवा ऑफलाईन यापेकी कोणत्या पद्धतीने द्यावयाची आहे, याबाबतची विचारणा संबंधित महाविद्यालयाने/विद्यापीठ शैक्षणिक विभागाने/मॉडेल डिग्री कॉलेज, बुलढाणा यांनी विद्यार्थ्यांकडून करावी, व त्यानुसार परीक्षेचे नियोजन करावे.

३) ज्या समसत्रांच्या M.C.Q. प्रश्नपत्रिका विद्यापीठाकडे तयार नसतील त्या प्रश्नपत्रिकांचे सेटींग हिवाळी-२०२० मध्ये वापरण्यात आलेल्या कार्यपद्धतीप्रमाणेच करण्यात येईल.

४) हिवाळी-२०२० परीक्षेकरीता बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात तयार केलेल्या प्रश्नपत्रिका ज्या उपयोगात आलेल्या नाहीत, अशा मॉडरेट केलेल्या प्रश्नपत्रिका उन्हाळी-२०२१ परीक्षेमध्ये वापरण्यात याव्यात. तसेच ज्या प्रश्नपत्रिकांचे बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात प्रश्नसंच उपलब्ध नाहीत, अशा विषयांचे तीन प्रश्नसंच मागविण्यात यावे व त्यांचे प्रचलित पद्धतीने नियमन (मॉडरेशन) करण्यात यावे.

संबंधित महाविद्यालयांस पाठविण्यात येणाऱ्या प्राश्निकांच्या नांवांच्या यादी संबंधीत अभ्यास मंडळाचे अध्यक्षांना सुद्धा देण्यात यावी. प्रश्नसंच तयार करतेवेळी अडचणी उद्भवल्यास संबंधीत महाविद्यालयांचे प्राचार्यांनी संबंधीत अभ्यास मंडळाचे अध्यक्षांशी संपर्क साधून समस्यांचे निराकरण करुन घ्यावे

५) उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता विद्यापीठाद्वारे महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागांना/मॉडेल डीग्री कॉलेज बुलढाणा यांना प्रचलित पद्धतीनुसार प्रवेशपत्रे, रोललिस्ट, ग्रीन व ब्लॅक कंट्रोल शिट्स इत्यादी ऑनलाईन परीक्षेकरीता पोर्टलवर तसेच ऑफलाईन परीक्षेकरीता हार्ड कॉपी पुरविण्यात येईल.

६) शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील उन्हाळी-२०२१ च्या ज्या अभ्यासक्रमांना नियमित विद्यार्थी प्रवेशित आहेत, या सम सत्रांच्या परीक्षा तसेच Doctor of Pharmacy & Bachelor of Fine Arts या अभ्यासक्रमांच्या सर्व वर्षाच्या नियमित व माजी विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालयांनी/विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज बुलढाणा यांनी विद्यापीठाने दिलेल्या प्रश्नपत्रिका व जाहीर वेळापत्रकानुसार घ्यावयाच्या आहेत.

७) सदर परीक्षेकरीता विद्यापीठाद्वारे जाहीर वेळापत्रकानुसार प्रत्येक दिवसाच्या परीक्षेचे एक दिवस आधी प्रश्नपत्रिका व Answer-Key विद्यापीठाद्वारे प्राचार्यांचे/विभाग प्रमुखांचे/मानद संचालकांचे अधिकृत ई-मेल वर पाठविण्यात येईल. विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका पाठविण्याची व्यवस्था महाविद्यालयांनी निर्माण करावी.

८) महाविद्यालयांना / विद्यापीठ शैक्षणिक विभागांना / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढणा यांना एक दिवस अगोदर पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका व Answer-Key यांची गोपनीयता राखण्याची तसेच विद्यापीठाद्वारे जाहिर वेळापत्रकामध्ये नमूद वेळेनुसार परीक्षेचे संचालन करणे, याची जबाबदारी प्राचार्यांची/केंद्राधिकाऱ्यांची/विभाग प्रमुखांची/मानद संचालकांची राहील. महाविद्यालयांनी ऑनलाईन प्रश्नपत्रिकेची लिंक विद्यार्थ्यांना पाठविते वेळीच सदर लिंक विद्यापीठाच्या मोबाईल क्रमांक ९३५६८००६७३ वर विद्यापीठास सुद्धा पाठविणे बंधनकारक आहे.

९) शैक्षणिक सत्र २०२०-२१ मधील उन्हाळी-२०२१ च्या विषम सत्रांच्या परीक्षा तसेच समसत्रामधील ज्या अभ्यासक्रमांना नियमित विद्यार्थी प्रवेशित (जुना अभ्यासक्रम) नाहीत अशा अभ्यासक्रमांच्या परीक्षा संबंधीत महाविद्यालयाच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांच्या स्तरावर विद्यापीठाने दिलेल्या कालावधीमध्ये घ्यावयाच्या आहेत, त्याकरीता वेळापत्रक व बहुपर्यायी (M.C.Q.-Multiple Choice Question) स्वरुपात प्रश्नपत्रिका महाविद्यालयांना/विद्यापीठ शैक्षणिक विभागाना/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांना त्यांचे स्तरावर **"प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व सोडविण्याबाबतची माहिती"** या शिर्षांतर्गत दर्शविल्याप्रमाणे तयार करावयाच्या आहेत.

१०) विद्यार्थ्यांनी offline परीक्षेची मागणी केल्यास त्यांना देण्यात येणाऱ्या ऑफलाईन प्रश्नपत्रिकांमध्ये प्रत्येक प्रश्नाखाली चार पर्याय दिलेले राहतील, त्यावर विद्यार्थ्यांनी योग्य उत्तरास बरोबर (√) अशी खूण करावी.

११) विद्यार्थ्यांनी online/offline सोडविलेल्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन महाविद्यालयांनी/विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी त्यांचे स्तरावर करावे.

१२) महाविद्यालयाचे/विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा प्राचार्य/विभागप्रमुख/मानद संचालक परीक्षेकरीता केंद्राधिकारी म्हणुन कार्य करतील. अपरिहार्य परिस्थितीमध्ये प्राचार्य/विभागप्रमुख/मानद संचालक वरिष्ठ शिक्षकाची केंद्राधिकारी म्हणुन नियुक्ती करतील व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना कळवतील.

१३) उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता कोणत्याही परीक्षा केंद्रावर विद्यापीठाकडून सहकेंद्राधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येणार नाही.

१४) ज्या विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत परीक्षा आवेदनपत्रे व परीक्षाशुल्क भरूनही जर काही विद्यार्थ्यांचे नांव रोललिस्टमध्ये समाविष्ट झाले नसेल अशा विद्यार्थ्यांनी विहीत मुदतीत परीक्षा आवेदनपत्रे भरल्याची खात्री महाविद्यालयांनी त्यांचे स्तरावर करून सदर विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर परीक्षा क्रमांक वितरीत करावे. परीक्षा क्रमांक वितरीत करतांना प्रत्येक परीक्षेकरीता प्रथम ९ हा क्रमांक देऊन त्यानंतर महाविद्यालयाचा सांकेतांक क्रमांक व त्यानंतर अनुक्रमांक देण्यात यावा. (उदा.भारतीय महाविद्यालय, अमरावतीचा सांकेतांक ११० : येथील विद्यार्थ्यास बी.ए.सत्र-४ करीता परीक्षा क्रमांक द्यायचा असल्यास ९११०१, ९११०२, ९११०३ अशा प्रकारे देण्यात यावे. तसेच याच महाविद्यालयातील बी.एस.सत्र-४ करीता परीक्षा क्रमांक द्यायचा असल्यास ९११०१, ९११०२, ९११०३ अशा प्रकारे देण्यात यावे.) सदर विद्यार्थ्यांची माहिती खालील तक्त्यानुसार कंट्रोलशिटसोबत देण्यात यावी. तसेच माजी विद्यार्थी असल्यास सदर विद्यार्थ्याला ज्या सत्राची/वर्षाची परीक्षा द्यावयाची आहे, त्या सत्राच्या/वर्षाच्या या अगोदर दिलेल्या परीक्षेचा परीक्षा क्रमांक व वर्ष याबाबतची माहिती खालील तक्त्यात नमूद करावी.

| Sr. No. | Centre/College Code | Name of Student | Name of Exam. & Semester | Assigned Roll No. | Subject | Previous Roll No. & Year |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |

१५) परीक्षा संचालनाच्या काळात विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य हित लक्षात घेता, प्रत्येक परीक्षा केंद्रावर कोविड-१९ विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे बॅनर ठळकपणे परीक्षा केंद्राच्या दर्शनी भागात लावण्यात यावे.

१६) श्रेणी सुधार (Improvement of Division) या सवलतीअंतर्गत उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता व याअगोदर परीक्षा आवेदनपत्रे सादर केलेले विद्यार्थी या परीक्षेकरीता पात्र राहणार नाहीत, सदर विद्यार्थ्यांची परीक्षा ज्यावेळी प्रचलित पद्धतीने परीक्षांचे आयोजन होईल, त्यावेळी घेण्यात येईल.

१७) महाविद्यालयीन स्तरावर पार पडलेल्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिका व Answer-Key ची एक प्रत महाविद्यालयांना विद्यापीठामध्ये सादर करावी लागले.

## ब) परीक्षांचे वेळापत्रक :-

१८) उन्हाळी-२०२१ परीक्षांच्या संचालनासंदर्भात परीक्षेचा कालावधी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे राहील.

| अ.क्र. | अभ्यासक्रमांचे नांव | प्रात्यक्षिक परीक्षेचा कालावधी | लेखी परीक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | अभियांत्रिकी व तांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सम **सत्र-२,४,६,८** (जूने अभ्यासक्रम वगळून) **(विद्यापीठ स्तरावर)** | **दिनांक २१/०७/२०२१ ते २५/०७/२०२१** | दिनांक ०८/०७/२०२१ ते २०/०७/२०२१ |
| २ | अभियांत्रिकी व तांत्रिकी अभ्यासक्रमांच्या परीक्षा विषम **सत्र-३,५,७,९** व जून्या अभ्यासक्रमाच्या समसत्रांच्या परीक्षा **(Appendix-II & Appendix-III)** (महाविद्यालय स्तरावर) | **दिनांक २१/०७/२०२१ ते २५/०७/२०२१** | **दिनांक ०८/०७/२०२१ ते २०/०७/२०२१** |
| ३ | अ.क्र.१ व २ वरील परीक्षांव्यतिरिक्त उर्वरित अभ्यासक्रमांचे सम सत्र **(विद्यापीठ स्तरावर)** | संबंधित अभ्यासक्रमाची लेखी परीक्षा संपल्यानंतर एक आठवड्याच्या आत पूर्ण कराव्या. | दिनांक ०९/०८/२०२१ ते २९/०८/२०२१ |
| ४ | अ.क्र.१ व २ वरील परीक्षांव्यतिरिक्त उर्वरित अभ्यासक्रमांचे विषम सत्र व जूना अभ्यासक्रम **(जून्या अभ्यासक्रमाची यादी सोबत Appendix-II नुसार जोडली आहे.) (महाविद्यालय स्तरावर)** | उपरोक्त अनुक्रमांक ३ मधिल स्तंभ क्रमांक ३ सोबत आयोजीत कराव्यात. | दिनांक ३०/०८/२०२१ ते ०५/०९/२०२१ |
| ५ | केंद्रीय प्रवेश समितीद्वारे **(अभियांत्रिकी व तांत्रिकी अभ्यासक्रम वगळून)** होणाऱ्या प्रवेशाच्या अभ्यासक्रमाच्या **सत्र-२** तसेच अभियांत्रिकी व तांत्रिकी पदवी अभ्यासक्रमातील सत्र-१ व २ ची परीक्षा दिनांक २०/०८/२०२१ च्या पुढे विद्यापीठ स्तरावर संचालित करण्यात येईल. | | |

१९) मुद्दा क्रमांक १८ मधील अनुक्रमांक १, ३ व ५ वरील परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाद्वारे जाहीर करण्यात येईल. विद्यापीठाद्वारे जाहीर झालेल्या लेखी परीक्षेचे वेळापत्रक, प्रात्याक्षिक परीक्षेचा कालावधी, परीक्षा घेतांना कोविड-१९ विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी घ्यावयाची काळजी व परीक्षेची पद्धत इत्यादीबाबत महाविद्यालयाने / विद्यापीठ शैक्षणिक विभागाने विद्यार्थ्यांना त्यांचे स्तरावर अवगत करून द्यावे.

२०) दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता यापूर्वीच्या पद्धतीप्रमाणेच अतिरिक्त वेळ देण्यात येईल.

## क) प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व सोडविण्याबाबतची माहिती :-

२१) प्रत्येक प्रश्नपत्रिकेमध्ये संपूर्ण अभ्यासक्रमांवर आधारित प्रत्येक युनिटवर साधारणतः समान संख्येने बहुपर्यायी (M.C.Q.- Multiple Choice Question) स्वरुपात एकुण ४० प्रश्न राहतील. सर्व प्रश्न विद्यार्थ्यांना सोडविणे बंधनकारक राहील.

२२) प्रत्येक प्रश्नाला प्रत्येकी दोन गुण राहतील.

२३) परीक्षेचा कालावधी हा प्रत्येक प्रश्नपत्रिकेकरीता **६० मिनीटांचा राहील (एक तास)**

२४) चुकीच्या उत्तरांसाठी Negative marking पद्धती असणार नाही.

## ड) प्रात्यक्षिक/प्रकल्प/मौखिक परीक्षेबाबत :-

२५) पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमातील प्रात्याक्षिक परीक्षा व प्रकल्प परीक्षा महाविद्यालयाने/विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी त्यांचे स्तरावर कोविड-१९ च्या पार्श्वभूमिवर सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाद्वारे जाहीर मार्गदर्शक तत्वांचे पालन करुन ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने अभ्यासक्रमिकेमध्ये नमूद योजनेनुसार आयोजीत करावयाच्या असून याकरीता बाह्य परीक्षकाची नियुक्ती न करता महाविद्यालयातील/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा येथील विषय शिक्षकांची नियुक्ती करुन परीक्षा घेण्यात याव्यात व प्रात्याक्षिक/प्रकल्प परीक्षांचे गुण प्रचलित पद्धतीने ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने विद्यापीठाकडे पाठविण्यात यावेत.

२६) पदव्यूत्तर अभ्यासक्रमातील प्रकल्प परीक्षांना (Dissertation/Project) मौखिक परीक्षा (Viva-voce) नाही, परंतु प्रकल्प अहवाल परीक्षकाकडून मुल्यांकित करून घ्यावयाचे आहेत अशा परीक्षांचे निकाल परीक्षकाकडून प्रकल्पांचे मुल्यांकन होवून आल्यानंतर निकाल जाहीर करण्यात येईल.

२७) उन्हाळी-२०२१ च्या प्रात्याक्षिक परीक्षेचे आयोजन कोरोना-१९ शासन निर्देशानुसार प्रचलित पद्धतीने घेणे न झाल्यास, विद्यापीठाचे प्रात्याक्षिक परीक्षा संबंधित पत्र क्र.संगाबाअवि/संपमूमं./१२६/२०२१, दिनांक २६.३.२०२१ चे मार्गदर्शन घेवून उन्हाळी-२०२१ प्रात्याक्षिक परीक्षेचे आयोजन करावे.

२८) प्रात्यक्षिक परीक्षांकरीता बाह्य परीक्षकांची नियुक्ती करण्यात येवू नये. या सर्व प्रात्यक्षिक परीक्षा या अंतर्गत परीक्षकांची नियुक्ती करुन संचालित करण्यात याव्यात.

२९) संबंधीत महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी / विद्यापीठ विभागाच्या विभाग प्रमुखांनी / मानद संचालक यांनी प्रमाणित केलेले प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण, विद्यापीठाने महाविद्यालयाला / विद्यापीठ शैक्षणिक विभागाला / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांना पुरविलेल्या लॉगीनमध्ये/परीक्षा व विषय निहाय कंट्रोल शिट्स (ग्रीन व ब्लॅक) मध्ये नमूद केलेल्या तारखेला विद्यापीठाकडे सादर कराव्यात.

३०) मुल्यांकन आटोपल्यानंतर विद्यापीठाकडून प्राप्त कंट्रोलशिटमध्ये प्रचलित पद्धतीने गुण भरण्यात यावे. काही परीक्षार्थ्यांच्या प्रात्यक्षिक/लेखी परीक्षेच्या कंट्रोलशिट्स प्राप्त झाल्या नसतील तर कोऱ्या कंट्रोलशिटच्या झेरॉक्समध्ये गुण विद्यापीठाकडे सादर करावेत.

३१) शैक्षणिक सत्र-२०२०-२१ चे समसत्र विषयाचे (Even Semester) अभ्यासक्रम ऑनलाईन पद्धतीने सुरू असल्यामुळे अंतर्गत गुणांचे मुल्यांकन प्रचिलत पद्धतीने ऑनलाईन माध्यमाच्या उपयुक्त मार्गाने करावे.

३२) शैक्षणिक सत्र-२०२०-२१ मधील उन्हाळी-२०२१ परीक्षेकरीता प्रोत्साहनपर गुण (Incentive Marks) महाविद्यालयांनी प्रचलित पद्धतीनुसार विद्यापीठास सादर करावेत.

## इ) परीक्षांचे निकाल जाहिर करण्याबाबतची कार्यवाही :-

३३) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने सोडविलेल्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन संबंधित महाविद्यालयाच्या / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या / मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा च्या प्राचार्यांनी/विभागप्रमुखांनी/मानद संचालकांनी त्यांना विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या Answer-Key वरुन संबधित विषय शिक्षकांकडून करुन घ्यावे व गुण विद्यापीठाने उपलब्ध करून दिलेल्या कंट्रोलशिटमध्ये पाठवावे.

३४) मूल्यांकन झाल्यानंतर प्रचलित पद्धतीनुसार ऑनलाईन पोर्टलवर / ऑफलाईन पद्धतीने ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्वर विद्यापीठाने दिलेल्या मुदतीमध्ये गुण विद्यापीठात सादर करावेत.

३५) मूल्यांकनानंतर विद्यार्थ्यास मिळालेले गुण हे त्या परीक्षेच्या स्किमनुसार असलेल्या एकुण गुणांपैकी रुपांतरीत करुन मिळालेले गुण ऑनलाईन/ऑफलाईन कंट्रोलशिटमध्ये भरावेत.

## ई) समुपदेशन

३६) विद्यार्थ्यांना परीक्षेसंबंधी मार्गदर्शन करण्याकरीता मा.कुलगुरु व संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे मार्गदर्शनपर उद्बोधनाची व्हीडीओक्लीप तयार करुन विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसारित करण्यत यावी. तसेच प्रत्येक महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी त्यांचे स्तरावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.

## भाग-२

**अ) महाविद्यालयातील/विद्यापीठ शैक्षणिक विभागातील परीक्षा केंद्रावर कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे विद्यार्थ्यांची सुरक्षा व आरोग्य हित लक्षात घेता, खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.:-**

i) परीक्षा केंद्रावरील सफाईगारांना व संबंधितांना स्वच्छता व निर्जंतुकीकरण (Periodic Sanitization) प्रशिक्षित करण्यात यावे.

ii) सर्व महाविद्यालयांनी / विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी त्यांचे परीक्षा केंद्रावर मुख्य वाहतुक रस्त्याने व परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या आतील व बाहेरील भागांची औषध फवारणीद्वारे नियोजीत कालावधीत निर्जतुकीकरण करावे.

iii) परीक्षा केंद्रावर, प्रशासकीय विभागात आणि परीक्षा गृहात Hand Sanitizer व Handwash ची व्यवस्था करण्यात यावी.

iv) परीक्षा केंद्रावर परीक्षा संचालनादरम्यान कार्य करणारे शिक्षक, पर्यवेक्षक, वॉटरमन व इतर सर्व कर्मचारी यांना Mask शिवाय प्रवेश निषिद्ध राहील. तसेच सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना Mask वापरण्याबाबत महाविद्यालयाने आपले स्तरावर न चुकता अवगत करावे.

v) विद्यार्थ्यांची खोलीनिहाय बैठक व्यवस्था ही Physical Distancing चे पालन होईल, या पद्धतीने करण्यात यावी.

vi) Thermal Scanner ची व्यवस्था शक्य असल्यास करण्यात यावी.

vii) परीक्षा केंद्रावर वॉटर कुलर व प्रसाधन गृहाचा वापर बाहेरील कोणतीही व्यक्ती करणार नाही, याची पुर्णपणे दक्षता घेण्यात यावी.

viii) परीक्षा केंद्रावरील उपहार गृहामध्ये सुद्धा उपरोक्तप्रमाणे प्रतिबंधात्मक व्यवस्था करणे आवश्यक राहील, तसे निर्देश संबंधीत व्यवस्थापकास देण्यात यावे.

ix) परीक्षा केंद्रावर वापरण्यात येणारे Disposable Mask व Hand Gloves सुरक्षितपणे नष्ट करण्याची काळजी घेण्यात यावी.

x) कोविड-१९ प्रभाव थुंकीतूनही होत असल्यामुळे परीक्षा केंद्राच्या इमारतीमध्ये व परिसरात कुणीही थुंकणार नाही, याबाबतची विशेष काळजी घेण्यात यावी, जर असे आढळल्यास संबंधीतांवर दंडात्मक कार्यवाही त्वरित करण्यात यावी.

xi) परीक्षा केंद्रावरील / महाविद्यालयाचे / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या इमारतीमध्ये व परिसरामध्ये दर्शनी भागावर कचरा पेटी ठेवण्यात यावी.

xii) कोविड-१९ चा प्रादुर्भाव टाळण्याकरीता शासनाद्वारे/U.G.C., A.I.C.T.E इत्यादी शिखर संस्थेद्वारे प्राप्त निर्देशानुसार तसेच निर्गमीत मार्गदर्शक तत्वांचे अवलोकन करुन इतरही बाबींचा अवलंब करण्यात यावा.

xiii) महाविद्यालयांमध्ये/परीक्षा केंद्रावर/विद्यापीठ शैक्षणिक विभागामध्ये निर्जंतूकीकरण व्यवस्था व बैठक व्यवस्था ही शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार महाविद्यालयांद्वारे करण्यात यावी. निर्जंतूकीकरणासाठी प्रति विद्यार्थी खर्च विद्यापीठाद्वारे देण्यात येईल.

**ब) ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षा देणे शक्य नसेल अशा विद्यार्थ्यांची महाविद्यालयांनी / विद्यापीठ शैक्षणिक विभागांनी/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी ऑफलाईन परीक्षा घेवून मूल्यांकनासंबंधी करावयाची कार्यवाही:-**

i) प्रत्येक महाविद्यालयात / विद्यापीठ शैक्षणिक विभागात प्रश्नपत्रिकेकरीता Online Link तयार करण्याची संपूर्ण कार्यवाही व मूल्यांकन कार्य करण्याकरीता आवश्यकतेनुसार स्वतंत्र कक्ष तयार करुन याबाबतचे संपूर्ण कामकाज प्राचार्य/केंद्राधिकारी/विभागप्रमुख/मानद संचालक यांचे नियंत्रणाखाली व देखरेखीखाली गोपनीयतेचा भंग होणार नाही, याबाबतची काळजी घेवून पार पाडल्या जाईल.

ii) महाविद्यालयाने / विद्यापीठ शैक्षणिक विभागाने/ मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांनी महाविद्यालयातच / विद्यापीठ शैक्षणिक विभागातच मूल्यांकन केंद्र आवश्यकतेनुसार स्थापित करुन त्या ठिकाणीच मूल्यांकन करणे अनिवार्य राहील.

iii) विषयाचे मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर त्या विषयाचे गुण विद्यापीठाने पुरविलेल्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्स मध्ये मूल्यांकन अधिकाऱ्याच्या देखरेखीत भरावेत.

iv) परीक्षाचे मूल्यांकन झाल्यानंतर त्या त्या विषयाचे गुण विद्यापीठाने पुरविलेल्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्समध्ये प्राचार्य/केंद्राधिकारी/विभागप्रमुख/मानद संचालक यांच्या देखरेखीखाली भरावे.

v) विषयाचे गुण सारणीकारांकडून कंट्रोलशिट्स मध्ये भरल्यानंतर प्राचार्य/केंद्राधिकारी/विभागप्रमुख यांनी रॅन्डम (Random) पद्धतीने तपासून घ्यावेत.

vi) संपूर्ण परीक्षांचे मूल्यांकन पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या / विद्यापीठ शैक्षणिक विभागप्रमुखाच्या/मानद संचालकांच्या स्वाक्षरी व शिक्क्यानिशी सिलबंद लिफाफ्यात लेखी परीक्षेच्या ग्रीन व ब्लॅक कंट्रोलशिट्स मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे पाठविण्यात याव्यात. तसेच लिफाफ्यावर महाविद्यालयाचे नाव/विद्यापीठ शैक्षणिक विभागाचे नांव, परीक्षेचे नांव व विषयाचे नांव ठळकपणे नमूद करावे.

vii) Online Service Provider यांच्या पोर्टलद्वारे संचालित होणाऱ्या परीक्षेसंदर्भात महाविद्यालयांनी लेखी परीक्षेचे अंतर्गत गुण, प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण व लेखी परीक्षेचे गुण आपल्या महाविद्यालयाच्या/विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या/मॉडेल डीग्री कॉलेज, बुलढाणा यांच्या लॉगीनने ऑनलाईन पोर्टलमध्ये अचुकतेने ऑनलाईन द्वारे भरण्यात यावे. याबाबीची अधिक दक्षतेने व गांभिर्याने काळजी घ्यावी, व तसेच पोर्टलवर भरलेल्या गुणांची Soft Copy मूल्यांकन केंद्रातच संग्रहित करुन ठेवावी.

viii) परीक्षा केंद्रांना आकस्मिक भेट देण्याकरीता विद्यापीठाद्वारे दक्षता पथकाची निर्मीती केल्या जाईल.

**क) परीक्षेमध्ये गैरमार्गाचा अवलंब केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती-**

i) परीक्षा केंद्रावर होणाऱ्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांने अथवा इतरांनी गैरमार्गाचा अवलंब केल्यास, अशी सर्व प्रकरणे विद्यापीठाने महाविद्यालयास पुरविलेल्या विहित प्रपत्रात आवश्यक ती माहिती भरुन त्वरित सहाय्यक कुलसचिव (गोपनीय), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेकडे सादर करणे आवश्यक आहे.

ii) महाविद्यालयाकडून प्राप्त झालेली परीक्षेमधील गैरमार्गाची सर्व प्रकरणावर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील कलम ४८(५)(ख) नुसार परीक्षेच्या गैरव्यवहारात किंवा गैरप्रकारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सहभागी असणाऱ्या संबंधितांवर शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

**ड) महाविद्यालयीन / विद्यापीठ शैक्षणिक विभागाच्या स्तरावर ऑनलाईन/ऑफलाईन परीक्षेच्या संचालनाकरीता खालीलप्रमाणे खर्च देय राहील.**

**-तक्ता-**

| अ.क्र. | परीक्षा केंद्रावरील अधिकारी/ कर्मचारी/व्यवस्था | मानधन/परिश्रमिक (प्रतिदिन) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थी संख्या | द्यावयाचे मानधन | विद्यार्थी संख्या | द्यावयाचे मानधन |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | परीक्षा केंद्राधिकारी<br>Online & Offline | --- | रु.५००/-<br>(प्रतिदिन) | --- | -- |
| २ | पर्यवेक्षक<br>Offline | १-३५ विद्यार्थ्यामागे प्रतिपाळी | रु.१५०/- | -- | -- |
| ३ | लिपीक Online/Offline | प्रतिदिन | रु.२००/- | -- | -- |
| ४ | शिपाई Online/Offline | प्रतिदिन | रु.१००/- | -- | -- |
| ५ | वाटरमन Offline | १-१०० पर्यंत प्रतिपाळी | रु.७५/- | पुढील प्रत्येक १०० विद्यार्थ्यामागे प्रतिपाळी | रु.५०/- |
| ६ | सफाईगार Offline | प्रति १०० विद्यार्थ्यामागे | रु.१५० | -- | -- |
| ७ | Offline परीक्षेकरीता उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन दर | रुपये ६/-(रुपये सहा फक्त) प्रती उत्तरपत्रिका | | | |
| ८ | निर्जंतूकीकरण व्यवस्था Offline<br>(प्रति दिवस) | १ ते १०० विद्यार्थ्यांकरीता रुपये ५००/-<br>१०१ ते २०० विद्यार्थ्यांकरीता रुपये ७५०/-<br>२०० वर विद्यार्थ्यांकरीता रुपये १०००/- | | | |
| ९ | Offline परीक्षेकरीता प्रश्नपत्रिकांच्या झेरॉक्स काढणे | प्रति विद्यार्थी प्रती पेपर रुपये ४.००/- | | | |
| १० | ऑनलाईन प्रश्नपत्रिका व्यवस्था निर्माण करणे. (पोर्टलवर/कंट्रोलशिटवर गुणदान करणे) | प्रति विद्यार्थी व प्रति पेपर रुपये १०/- किंवा<br>कमित कमी रुपये २००/-<br>यापैकी जी रक्कम जास्त असेल ती देय राहील. | | | |
| ११ | स्टेशनरी खर्च Online/Offline | प्रति विद्यार्थी रुपये ०४/- | | | |

उपरोक्त परीक्षा पद्धती जुलै-२०२१ मधील कोविड-१९ ची स्थिती व त्याअनुषंगाने शासनाक्डून प्राप्त निर्देशांचे/सूचनांचे अनुषंगाने निश्चित करण्यात आलेली आहे. तथापि, सदर परिस्थितीत बदल झाल्यास व त्याअनुषंगाने शासनाकडून निर्देश/सूचना प्राप्त झाल्यास त्यानुसार परीक्षा कार्यपद्धती व संचालनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार तसेच वरील कार्यपद्धतीत समाविष्ट नसलेल्या बाबींवर निर्णय घेण्याचा व कार्यवाही करण्याचे अधिकार मा.कुलगुरुंना राहील.

(**टिप :-** (१) उपरोक्त कार्यपद्धतीनुसार परीक्षा संचालन सुचारु पद्धतीने पार पाडण्यासाठी लागणाऱ्या सूचना परीक्षा विभागाद्वारे आवश्यकतेनुसार निर्गमीत करण्यात येतील.

(२) याशिवाय विद्यार्थ्यांना उपरोक्त परीक्षांसंदर्भात काही अडचणी असल्यास, त्या त्यांनी विद्यापीठाचा WhatsApp No.9356800673/exam2020@sgbau.ac.in वर मेसेज स्वरुपात कळवाव्यात. विद्यापीठाद्वारे त्यांचे निरसन करण्याचा पूर्ण प्रयत्न करण्यात येईल.)

*****

**APPENDIX-II**

## SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY

## SUMMER - 2021 EXAMINATION TO BE CONDUCT BY COLLEGE

| Sr.No. | Name of Examination |
|---|---|
| 1. | All Annual Pattern Examinations except Doctor of Pharmacy and Bachelor of Fine Arts (Please refer Appendix - III for Old Course Chances) |
| 2. | All Semester Pattern Examinations (Except Engineering) Semester I,III,V,VII,IX |
| 3. | All Diploma Semester Pattern Sem I,III |
| 92. | B.E. Sem. I,II,III,IV,V,VII (CGS) |
| 93. | B.E. / B.Tech. / B.Text. Semester III (CBCS) |
| 94. | B.E Sem. I,II,V. (Old Course) |
| 95. | B.Tech. Sem I,II,III,IV,V,VII (CGS) |
| 96. | B.Tech. Semester I,II,III,IV,VIII (Old Course) |
| 97. | B.Text. Semester III, IV,V,VII (CGS) |
| 98. | B.Arch. Sem. I,III,V,VII, (CGS) |
| 99. | B.Arch. All Sem (Old Course) |
| 100. | B.E. Sem III To VIII (Instrumentation / Biomedical / Production / Electronics (XN) ) |
| 101. | B.Tech. Sem I To VIII (Polymar ) |
| 102. | M.E., M.Tech. (Full Time) Sem. I (All Branches) |
| 103. | M.E. (Part Time) Sem. I,II,III,IV (All Branches) |
| 104. | M.Sc. (Applied Electronics) (C.G.S.) Semester I, III |
| 105. | M.C.A. Sem. I,II,III (CGS - NEW) M.C.A. Semester Pattern All Semester.(OLD) |
| 106. | Two Year MCA Sem I (CBCS) |
| 107. | P.G. Dip. In Computer Science Sem. I (NEW) (C.G.S.), P.G. Dip. In Computer Science Sem. I & II (C.G.S. - OLD) |
| 108. | B.E. (Part Time) |
| 109. | All other old course examinations / subjects which are not included in Summer - 2021 Timetable |

**APPENDIX-III**

## Annual Pattern Examination Chances

| Sr.No. | Name of Examination Courses | Chances |
|---|---|---|
| 1 | B.A., B.Com., B.B.A., and B.P.A. Part-III | Winter-2020(1) & Summer/Winter-2021 (2) Summer/Winter-2021 (2) |
| 2 | B.A., B.Com., B.B.A., and B.P.A. Part-II | Winter-2020(1) & Summer -2021 (1) |
| 3 | M.A.Part-I (Philosophy, Psy, Yogshastra, H-Eco, Gender & Women Studies, Geography, Music, Translation Hindi, Urdu, Pali & Prakrit) | Summer-2021 & Summer-2022(2) Winter-2021 (1) |
| 4 | M.A.Part-II (Philosophy, Psy, Yogshastra, H-Eco, Gender & Women Studies, Geography, Music, Translation Hindi, Urdu, Pali & Prakrit) | Summer-2022 & Summer-2023(2) Summer-2021 (1) Winter-2020 (1) |
| 5 | M.Com.Part-II (For failure students of M.Com. marking system (old) course) | Winter-2020(1) Summer -2021(1) |
| 6 | Bachelor of Library Science | Till Summer-2022(1) |
| 7 | Master of Library Science | Till Summer-2022(1) |
| 8 | B.J.M.C., B.S.W. & B.A. in Social Work (All Final Year) | Till Winter-2021(1) |
| 9 | M.J.M.C. Sem-III & IV | Winter-2020 & Summer-2021 (2) Respectively |
| 10 | B.A., B.Com., B.B.A. and B.P.A. (All Part-I Examination) | Summer & Winter-2021 (2) only |
| 11 | M.Com.Part-I (For failure students of M.Com. marking system (old) course) | Summer & Winter-2021 (2) only |
| 12 | M.Pharm. Sem-I | Summer & Winter-2021 (2) only |
| 13 | M.Pharm. Sem-II | Summer & Winter-2021 (2) only |
| 14 | M.Pharm. Sem-III | Till Summer-2021(1) |
| 15 | M.Pharm. Sem-IV | Till Summer-2021(1) |

उपरोक्तप्रमाणे Appendix-I, II & III मध्ये दिलेल्या कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करुन परीक्षा संचालनास सहकार्य करावे, ही विनंती.

धन्यवाद.

आपला,

(डॉ.हेमंत आर.देशमुख)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलीपी : माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता :-**

(१) वित्त व लेखा अधिकारी
(२) समन्वयक, विद्यापीठ शैक्षणिक विभागांचे प्रशासकीय केंद्र, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(३) यंत्रणा विश्लेषक (आय.सी.आर.)
(४) जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(५) सहाय्यक कुलसचिव (आचार्य कक्ष)
(६) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा/चौकशी)
(७) सहाय्यक कुलसचिव (परीक्षा)
(८) सहाय्यक कुलसचिव (गोपनीय)
(९) सहाय्यक कुलसचिव (सारणी)
(१०) सहाय्यक कुलसचिव (सं.प.मू.मं. कार्यालय)
(११) मुख्य अधिकारी, केंद्रीय मूल्यांकन कार्यक्रम केंद्र

प्रत-सविनय सादर

१. मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
२. मा.कुलसचिव. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ